माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.१४४८५/२०२१/अ.क्र.५०५५ /२०२६

श्री. गुलामनाबी मंसूरी
३ अली अमर सेंट नल बाजार,
जुमा मस्जिद ट्रस्ट बिल्डिंग, २ रा माळा,
आर नं.०३ / ३ ए /३ बी, मुंबई-४००००३.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व.का) सी विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त, सी विभाग यांचे कार्यालय,
७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मरीन लाईन्स (पू.), मुंबई ४०० ००२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सी विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त, सी विभाग यांचे कार्यालय,
७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मरीन लाईन्स (पू.), मुंबई ४०० ००२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०४.२०२६**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १८.१०.२०२१ | २५.१०.२०२१ | १५.११.२०२१ | -- |

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दि.१६/०९/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली असून **खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आलेले आहेत :-**

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१६.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) सी विभाग व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता सी विभाग अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असे विशद केले की, मूळ जोडपत्रावर कोणताही प्रतिसाद देण्यात आलेला नाही.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, प्रस्तुत प्रकरणी कार्यालयाच्यावतीने सुनावणी सूचना ही जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता इमारत व कारखाने, सी विभाग तसेच अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता सी विभाग यांना निर्गमित

Jyotsna

करण्यात आली होती. प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी श्री. गुलामनाबी मंसुरी यांनी दाखल केलेले जोडपत्र-अ मध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (परि-१) यांचे कार्यालय मुंबई महानगरपालिका यांच्याकडे दाखल करण्यात आला होता. तसेच प्रथम अपील अर्ज हा उप आयुक्त परिमंडळ-१ यांच्याकडे दाखल करण्यात आला होता.

अपिलार्थी यांनी योग्य त्या प्राधिकरणाकडे सुनावणी सूचना जारी करण्यात आली नसल्याचे आज निदर्शनास आणले असून उपरोक्त प्राधिकरणाने तात्काळ सुनावणी सूचना जारी करून व प्रस्तुत प्रकरणी त्याच्या स्तरावर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (परि-१) व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेले माहिती अधिकार अर्जावरील कार्यवाही व अपिलाशी संबंधित तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खुलासासह पुरावा दर्शन कागदपत्रांसह पुढील सुनावणीस आयोगात व्यक्तिशः हजर राहावे. या अपिलावर पुढील सुनावणी दि.०४.११.२०२५ रोजी दुपारी २.००वा. आयोजित करण्यात येत असून सदर सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक त्या सर्व कागपत्रांसह व खुलासासह उपस्थित राहावे.

तथापि, असे असतानाही जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त परिमंडळ-१ व तत्कालीन अपिलीय अधिकारी यांना सुनावणीस हजर राहण्याविषयी याआधी सूचित करण्यात आले होते. तथापि, कार्यालयाच्या वतीने पुनःश्च एकदा जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, इमारत व कारखाने, सी विभाग व कार्यकारी अभियंता, सी विभाग यांनाच सुनावणी सूचना जारी करण्यात आली असल्याने योग्य ते प्राधिकरण आज उपस्थित नसल्याविषयी अपिलार्थींनी नमूद केले आहे.[redacted]

ही बाब लक्षात घेता योग्य त्या प्राधिकरणांना सुनावणी सूचना जारी करण्यात यावी त्यानंतर अंतिम सुनावणी घेण्यात येऊन आदेश पारित करण्यात येतील.

**आदेश**

**सदर अपिलावर पुर्नसुनावणीनंतर अंतिम आदेश देण्यात येतील.**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०७-०४-२०२६**

Jyotsna